दिनांक ०२/०३/२०२१

# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक रणजीत गंगाधर कासले, पद-पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद (ग्रामीण) यांनी २०,०००/- रु लाचेची मागणी केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव, हुद्दा | :- | रणजीत गंगाधर कासले, वय ३६ वर्ष, पद-पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद (ग्रामीण) |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. गणेश धोक्रट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | २०,०००/- रु |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्याविरुद्ध दाखल गुन्ह्यात, तक्रारदार यांच्या बाजूने मा. न्यायालयात चांगला म्हणने सादर करण्यासाठी |
| लाच मागणी ठिकाण | :- | पिशोर नाका, पिशोर, ता कन्नड, जि. औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्या विरुद्ध पोलीस ठाणे पिशोर येथे पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे. सदर दाखल गुन्ह्यात मा. न्यायालयाने तपासीक अधिकारी यांना त्यांचे म्हणने सादर करणे बाबत सांगितले होते. यातील आलोसे हे तक्रारदार यांच्या बाजूने चांगले म्हणने मा. न्यायालयात सादर करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रु लाचेची मागणी करित असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, रणजीत गंगाधर कासले, वय ३६ वर्ष, पद-पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद (ग्रामीण) यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे पिशोर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार गणेश पंडुरे, सुनिल पाटील, अशोक नागरगोजे, चालक अंमलदार देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

02.03.2021

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.